# <u>विनंती अर्ज</u>

दिनांक : १२/०३/२०२४

प्रति,

मा.डॉ.हेमंत वसेकर भा.प्र.से.,
प्रकल्प संचालक,
मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
एमएसएफसी इमारत, २७० भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर,
गोखलेनगर, पुणे, महाराष्ट्र - ४१११०१६

**<u>विषय :- मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत दिनांक १४/०७/२०२३ रोजी, PIU(Agri) मार्फत अंतिम केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाबाबत.</u>**

संदर्भ :- १) श्री. नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांचा तक्रार अर्ज दि. २३/०६/२३
२) अध्यक्ष श्री गेनसिध्द शेतकरी उत्पादक कंपनी, कुंभारी यांचे खुलासा पत्र दि. ०४/०७/२३
३) माझा खुलासा पत्र दिनांक १३/०७/२०२३
४) PIU (Agri) चे चौकशी समितीचा अहवाल दिनांक १४/०७/२०२३
५) मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे यांचे पत्र क्रं. दि. ४९ दि.१९/०१/२४

आदरणीय महोदय,

विषयाचे अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, राज्यामध्ये जागतिक बँकेचे अर्थसहाय्यातून मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्यांत येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत माहे जुन २०२३ मध्ये श्री. नितिन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांनी पुणे विभागाचे तत्कालीन संपादन अधिकारी यांचे विरूध्द सादर केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषांगने स्थापन करण्यांत आलेल्या चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून आपण कामकाज पाहिलेले आहे. तसेच सदर प्रकरणी संदर्भ क्रं. ४ अन्वये, आपण चौकशी समितीचा अहवाल अंतिम केलेला असून सदरच्या चौकशी समितीच्या अहवालानुसार माझ्या सेवा समाप्त करून माझे नांव काळया यादीत टाकण्याबाबत कार्यवाही करण्यांत आलेली आहे.

त्याअनुषंगाने सादर करण्यांत येते की, वरिल प्रमाणे संदर्भ क्रं. ४ अन्वये, आपण अंतिम केलेला चौकशी अहवालाबाबत मा. मुंबई उच्चय न्यायालयाचे सेवा निवृत्त न्यायाधिश व मा.उच्च न्यायालयातील सेवा विषयक प्रकरणे हाताळणारे कांही तज्ञ ॲडव्हकेट तसेच मा. प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) येथिल कांही तज्ञ ॲडव्हकेट त्यांचे मार्फत पुर्नविलोकन करून घेतले आहे. त्यामध्ये सदरच्या चौकशी समिती मार्फत अत्यंत बेजबादार, निष्काळजीपणे व पक्षपातीपध्दतीने सदरची चौकशी करण्यांत आलेली आहे. सदर चौकशीच्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे अक्षेप नोंदविण्यांत येत आहेत.

A) संदर्भ क्रं. १ चे श्री. नितिन मिसाळ यांचे तक्रार अर्जाचे अनुषंगाने विश्लेषन

| अ.क्रं. | तक्रार अर्जामधील मुददे / आरोप | चौकशी सिमितीने केलेली कार्यवाही | चौकशी समिती विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | तक्रार अर्जातील पृष्ठ क्रं. १, "परंतू पुणे डिव्हिजन मधील एक व्यक्ती (सुनिल शेलार) कांही इतर मशनरिज पुरवठा करणा-या कंपनीकडून १० ते १५% कमिशनची बोलनी केली." | याबाबत कोणताही पुरवा उपलब्ध करून देण्यांत आलेला नाही, तसेच सदर आरोपाच्या सिध्दीसाठी चौकशी समितीने कोणतेही निष्कर्श नमुद केले नाहीत. | याबाबत चौकशी समितीने पडताळणी करून पुणे विभागात मशिनरीसाठी निवड झालेल्या पुरवठादार यांचे जाबाब नोंदविणे आवश्यक होते. जेणे करून सदर आरोपामध्ये तथ्य आहे किंवा नाही याबाबत खात्री करणे शक्य झाले असते. सदरचा आरोप हा केवळ सुडबुध्दी व धुर्तनिती ने करण्यांत आलेला आहे. |
| २ | तक्रार अर्जातील पृष्ठ क्रं. १, त्याकारणाने आमच्या कंपनीला निवीदेमधुन बाहेर काढण्यासाठी अटोकाट प्रयत्न करीत आहे. आणि जर आम्ही संपूर्ण दस्ताऐवजांची पुर्तता निविदेमध्ये केलेली असेल तर आम्हाला बोलवून PO देतो ॲडव्हान्स १०% लागतील, अट जर मान्य नसेल तर रिटेंडर करतो अशि धमकी सुध्दा दिली जाते. आणि ते CBO वर प्रेशर टाकुन केले जाते. | याबाबत कोणताही पुरवा उपलब्ध करून देण्यांत आलेला नाही, तसेच सदर आरोपाच्या सिध्दीसाठी चौकशी समितीने कोणतेही निष्कर्श नमुद केले नाहीत. | संबंधीत तक्रारदार यांनी दिनांक १९/०५/२०२३ रोजी, रात्री ८.४७ वा माझे दुरध्वनीवर फोन करून, मला प्रलोभन देण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांचे प्रलोभनास बळी न पडता प्रमाणीक कार्यवाही केली आहे. सदर दुरध्वनी संभाषणाची रेकॉर्डींग उपलब्ध आहे. तसेच याबाबत चौकशी समितीने पडताळणी करून निशर्ष्क नोंदविणे आवश्यक होते. जेणे करून सदर आरोपामध्ये तथ्य आहे किंवा नाही याबाबत खात्री करणे शक्य झाले असते. सदरचा आरोप हा केवळ सुड बुध्दी, धुर्त निती ने करण्यांत आलेला आहे. |
| ४ | तक्रार अर्जातील पृष्ठ क्रं. २, "४ दिवस उलटून केल्या नंतर CBO चा मला फोन आला की तुमच्या एका दस्ताऐवजवर नंबर पाहिजे, तुम्ही संबंधीत अधिकारी (सुनिल शेलार ९४०४५१५५३७) यांच्याशी चर्चा करा, मी संपर्क केला असता त्यांनी मला सोलापूर ऑफीसला बोलावून घेतल मी ऑफीसला पोहंचलो त्यांनी मला ऑफीस बाहेरच्या बोलन केल की, श्री गेनसिध्द कंपनी CBO ची ऑर्डर ही | याबाबत कोणताही पुरवा उपलब्ध करून देण्यांत आलेला नाही, तसेच सदर आरोपाच्या सिध्दीसाठी चौकशी समितीने कोणतेही निष्कर्श नमुद केले नाहीत. | याबाबत चौकशी समितीने पडताळणी करून निशर्ष्क नोंदविणे आवश्यक होते. जेणे करून सदर आरोपामध्ये तथ्य आहे किंवा नाही याबाबत खात्री करणे शक्य झाले असते.<br>याबाबत वस्तुस्थिती अशि आहे की, तक्रारदार यांनी निविदादस्तात सादर केलेली कागदपत्रे बनावट आहेत, हे निदर्शनास आल्यामुळे सदरची निविदा स्वत: CBO यांचे विनंती व DIU संपादन समितीचे |

| अ.क्रं. | तक्रार अर्जामधील मुददे / आरोप | चौकशी सिमितीने केलेली कार्यवाही | चौकशी समिती विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| | L२ Company Zenit Enginering and Works (Ambala) यांना जाऊ दया कारण मला वरून प्रेशर आहे. कांही न बोलता आम्ही निघालो CBO ना विचारणा केली असता ते शेती क्रांती सोबतच काम करायला तयार होते. CBO ना या विषयी काहीच माहिती नव्हती. विचारणा केली असता सायंकाळी मी स्वत: शेलार यांना फोन करून संपर्क केला व कारण विचारले असता त्यांनी मला सरळ धमकीच दिली (मी रिटेंडर करतो) | | मान्यतेने रदद करण्यांत आलेली आहे. तक्रारदार हे बनावट कागदपत्रे ग्राहय धरण्यासाठी दबाव निर्माण करत होते. याबाबतचे दिनांक १९/०५/२०२३ रोजीचे दुरध्वनी संभाषणाचे रेकॉर्डींग आमचेकडे उपलब्ध आहे. सदर रेकॉर्डींग मध्ये संपादन अधिकारी यांनी तक्रारदार यांना स्पष्ट सांगितले आहे की, "माझ्या विभागात मी कोणाला अशी मदत करत नाही, तुम्ही प्रोफेशनली काम करा" तसेच तक्रारदार हे संपादन अधिकारी यांना प्रलोभव देण्याचा प्रयत्न करीत होते. परंतू संपादन अधिकारी यांनी त्यांचे प्रलोभोनास बळी न पडता त्यांना फटकारले याचा राग मनात धरून तक्रारदार यांनी खोटे आरोप केले आहेत. |
| ५ | २०/०६/२०२३ ला श्री गेनसिध्द फर्मार प्रोडुसर कंपनीचे दाळमिलचे टेंडर पुन्हा स्मार्ट प्रकल्पाच्या वेबसाईटवर प्रकाशीत झाला, या मागील कारण अद्रयाप मला कळाले नाही किंवा CBO कडून मला ठोस कारण देण्यांत आलेली नाही. | तसेच याबाबत M/s Shetikranti Food Machinery यांचेशी कोणताही पत्रव्यहार झाल्याचे दिसून येत नाही. | दिनांक २४/०५/२०२३ रोजी, भाग्यतारा शेतकरी उत्पादक कपंनी मार्फत M/s Shetikranti Food Machinery यांचे टर्न ओव्हर प्रमाणपत्र बनावट असल्याचा अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार CBO यांनी मंजुर निविदा दस्तातिल मुददा क्रं. ११.b अन्वये, फेर निविदा केलेली आहे. याबाबत चौकशी समितीने CBO यांचे अधिकारांवर गदा आणून त्यांचे अधिकारांवर अतिक्रम केले आहे. |
| ६ | ब-याच CBO कडून आम्हाला कळाले आहे की, संबंधित व्यक्ती हा एका विशिष्ठ कंपनीसाठी आमच्या कंपनीच्या विरोधात सांगतोय (भाग्यतारा FPO) तसेच टेकनीकल | याबाबत कोणताही पुरवा उपलब्ध करून देण्यांत आलेला नाही, तसेच सदर आरोपाच्या सिध्दीसाठी चौकशी | दिनांक २४/०५/२०२३ रोजी, भाग्यतारा शेतकरी उत्पादक कपंनी यांनी स्वत: M/s Shetikranti Food Machinery यांचे टर्न ओव्हर प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत CA |

| अ.क्रं. | तक्रार अर्जामधील मुददे / आरोप | चौकशी सिमितीने केलेली कार्यवाही | चौकशी समिती विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| | मध्ये बाहेर काढण्याचा प्रयत्न करतोय | समितीने कोणतेही निष्कर्श नमुद केले नाहीत. | मार्फत केली आहे. त्यानुसार ते बनावट असल्याचे सिध्द झाले आहे. याबाबत चौकशी समितीने भाग्यतारा शेतकरी उत्पादक कपंनी यांचा जाबाब नोंदविलेला नाही. |

**B) दिनांक १४/०७/२०२३ रोजीच्या चौकशी समितीचे अहवाला मधील निष्कर्श**

<table>
<tr><th>अ.क्रं.</th><th>चौकशी समितीचे निष्कर्श</th><th>निष्कर्शा विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td>१ व २</td><td>पुणे विभागात एकुण मंजुर ८५ CBO पैकी फक्त ४९ CBO चीच निविदा प्रक्रिया सुरू आहे. अदयाप देखील ३६ CBO व्दारे एकही निविदा प्रसिध्द करून संपादन प्रक्रिया सुरू केलेली नाही. वास्तविक पहाता RIU स्तरावरून विभागीय संपादन अधिकारी याचा पाठपुरावा करणे अपेक्षित आहे.<br>बहुतांश निविदा या तांत्रिक व आर्थिक मुल्यांकन करण्याकरीता समुयदाय आधारित संस्था, जिल्हास्तरावर एक ते दोन महिन्यापासून प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये संपादन अधिकारी याबाबतचा पाठपुरावा करणे आवश्यक होते. परंतू याबाबत दिरंगाई झाल्याचे दिसून येत आहे.</td><td>पुणे विभागातील लक्षांक हे संपूर्ण महाराष्ट्राचे तुलनेत पाहिले असता पुणे विभागात राज्याचे ६० टक्के लक्षांक एकटया पुणे विभागात आहे. वरिल वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही. तसेच मंजुर ८५ CBO पैकी ४९ CBO च्या निविदा सुरू आहेत, सदर लक्षांक साध्याची टक्केवारी ६० टक्के आहे. तथापी सदरचे लक्षांक साध्य करण्यासाठी संपादन अधिकारी यांनी संपूर्ण कार्यकाळात खालील प्रमाणे विभाग व जिल्हास्तरावर बैठका घेऊन् कामकाज गतिमान करण्यांचा प्रयत्न केलेला आहे. <u>(दिनांक ०२/०५/२०२२ ते २०/०७/२०२३)</u>
<table>
<tr><th rowspan="2">बाब</th><th rowspan="2">RIU, पुणे</th><th colspan="3">जिल्हा अंमबलजावणी कक्ष</th></tr>
<tr><th>पुणे</th><th>सोलापूर</th><th>अहमदनगर</th></tr>
<tr><td>संपादन पुर्व मान्यता बैठक</td><td>१३</td><td>७</td><td>१४</td><td>१२</td></tr>
</table>
यामुळेच दिनांक २०/०७/२०२३ अखेर पर्यंतचे पुणे विभागाची संपादन प्रक्रियेचा आलेख संपर्ण महाराष्ट्रात प्रथम स्थानावर होता. सदरची बाब दिनांक २०/०७/२०२३ अखेर राज्याच्या संपादन प्रक्रिया प्रगती अहवालाचे अवलोकन केले असता निदर्शनास येते. चौकशी समितीने निष्कर्श नोंदविता सदर बाबी विचारात घेतलेल्या नाहीत. याबाबत संपादन अधिकारी यांनी केलेले प्रयत्नांची शहानिशा व पडताळणी करण्यासाठी विभागीय संपादन समिती अध्यक्ष व जिल्हास्तरीय संपादन समिती अध्यक्ष व समुदाय आधारित संस्था यांचे अभिप्राय घेणे आवश्यक होते. म्हणजे संपादन अधिकारी यांनी किती परिश्रम घेऊन सदरची प्रगती साध्य केली आहे हे सिध्द झाले असते. तसेच संपादन अधिकारी यांचे कामाबाबत विभागीय, जिल्हास्तरीय अधिकारी तसेच CBO यांचे अभिप्राय समाधानकारक आहेत.<br>संपादन अधिकारी यांचे उत्कृष्ठ कामाची दखल घेऊन् मा.प्रकल्प संचालक व मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक यांनी दिनांक १८/०४/२०२३ रोजी, सोलापूर येथील CBO यांचे आढावा बैठकीत त्यांचा पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले होते.<br>वरिल प्रमाणे बाबी विचारात न घेता, चौकशी समितीने निष्कर्ष</td></tr>
</table>

| अ.क्रं. | चौकशी समितीचे निष्कर्श | निष्कर्शा विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | नोंदविण्यांत आले आहेत. |
| ३ | तक्रारदार श्री. नितीन मिसाळ यांनी केलेल्या तक्रारीनुसार M/s Shetikaranti Food Machinery यांची निविदा न्युन्नतम असल्याने त्यांना पुरवठा आदेश देणे अपेक्षित होते.<br>तसेच संपादन मार्गदर्शक सुचनेतील मुददा क्रं. ५.०३.१० अन्वये, दोन निविदा धारक तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास संपादन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करता येते. परंतू त्यांना पुरवठा आदेश देण्यांत आलेला नाही. तसेच तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे फेर निविदा करण्यांत आलेली आहे. यावरून त्यांच्या तक्रारीमध्ये कांही अंशी तथ्य असल्याची बाब निदर्शनास येत आहे. | तक्रारदार यांनी तक्रारअर्ज दिनांक २३/०६/२०२३ रोजी दाखल केला आहे. तथापी दिनांक २४/०५/२०२३ रोजीच तक्रारदार यांचे आर्थिक उलाढाल प्रमाणपत्र बनावट असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. याबाबत तक्रारदार यांनी संपादन अधिकारी यांना प्रलोभने देणे, राजकीय दबाव निर्माण करणे, बदनामी करण्याच्या धमकी देणे यांचा वापर करून निविदा मिळवण्यासाठी दिनांक २४/०५/२०२३ रोजी, दुपारी १२.५७ वा केलेल्या दुरध्वनी संभाषणाचे रेकॉर्डींग उपलब्ध आहे. सदरची बाब अहमदनगर व सोलापूर जिल्हास्तरीय संपादन समिती सदस्य यांना ज्ञात असून अशा पुरवठादार यांच्या निविदा रदद करण्याबाबत सर्वानुमते निर्णय झालेला आहे. तक्रारदार यांचे प्रलोभन व राजकिय दबावास बळी न पडता सदरची प्रक्रिया धाडसाने पारदर्शक पध्दतीने राबविली गेलेली आहे.<br>CBO यांनी केलेली पुर्निनिवदा ही त्यांचे मंजुर निविदा दस्तातील कलम ११.b चे अधिन राहून त्यांचे अधिकारात केलेली आहे.<br>११.b Award of contract:<br>b) Notwithstanding the above, the Purchaser reserves the right to accept or reject any quotations and to cancel the bidding process and reject all quotations at any time prior to the award of contract.<br>तसेच पुर्ननिविदाचे अधिकची समर्पक व वस्तुनिष्ठ कारणे CBO यांनी दिनांक ०४/०७/२०२३ रोजीचे पत्राने चौकशी समितीस सादर केली आहेत. परंतू त्याकडे चौकशी समितीने पुर्णत: दुर्लक्ष केले आहे. |
| ४ | निविदा प्रक्रियेबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार संपादन समितीस आहेत. परंतू सदर निर्णय घेताना मोठया प्रमाणात विलंब झाल्याचे दिसून येत आहे. तथापी ठोस कारणाशिवाय संस्थेने फेर निविदा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच याबाबत M/s Shetikranti Food Machinary यांचेशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. संस्थेने पर्याप्त स्पर्धा न झाल्याचे दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. | दिनांक २३/०२/२०२३ रोजी, मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट पुणे व संपादन तज्ञ PCMU यांनी दिलेल्या सुचने नुसार CBO यांचे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट मंजुर झाल्याशिवाय पुरवठा आदेश निर्गमित करू नयेत अशा स्पष्ट सुचना आहेत. संपादन प्रक्रिया, बँक लोन व ग्रॅन्ट ॲग्रीमेंट या तिन्ही प्रक्रिया संमातर सुरू असतात. तथापी ग्रॅन्ट ॲग्रीमेंट झाल्या शिवाय पुरवठा आदेश निर्गमित करू नये अशा सुचना असल्यामुळे पुरवठा आदेश देण्यांत आला नव्हता, तसेच CBO चे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट व FPP मधील दुरूस्तीचे कार्यवाही सुरू होती. याकडे चौकशी समितीने पुर्णत: दुलक्ष केले आहे. तसेच दरम्यानचे काळात संबंधीत तक्रारदार यांचे कंपनीबाबत व कागदपत्रांबाबत बनावटीकरणाची बाब समोर आल्याने CBO यांनी पुर्ननिविदा करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतू CBO यांनी सोलापूर येथे चौकशी दरम्यान सादर केलेले निवेदन व पुरावे विचारात घेण्यांत आलेले नाहीत. त्यातील कांही ठळत मुददे |

| अ.क्रं. | चौकशी समितीचे निष्कर्श | निष्कर्शा विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | पुढील प्रमाणे आहेत, जे चौकशी समितीने निष्कर्ष नोंदविण्यापूर्वी विचारात घेणे आवश्यक होते.<br>- कंपनीचे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट अदयाप मंजुर नाही<br>- L१ आलेली निविदा ही मंजुर FPP पेक्षा १० लक्ष ने अधिक असून सदरचा भार CBO उचलू शकत नाही.<br>- मे. शेतीक्रांती फुड मशिनरी यांचे साहित्यांचे दर्जाबाबत अनेक तक्रारी आहेत.<br>- मे. शेतीक्रांती यांनी निविदेत सहभागी होण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर केलेली आहेत. |
| ५ | तांत्रिक निविदा उघडल्यानंतरच निविदा दस्त ऐवजाची छाननी करून आवश्यक तेथे स्पष्टीकरण मागविणे अपेक्षित आहे. परंतू तांत्रिक मुल्यमापन अहवालापूर्वी प्राप्त निविदा दस्त ऐवजाबाबत व त्यामधील आर्थिक उलाढालीच्या प्रमाणपत्राबाबत स्पष्टीकरण मागविण्यांत आलेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. | तक्रारदार श्री. मिसाळ प्रो.प्रा. शेतीक्रांती फुड मशिनरी यांचे बनावट कागदपत्रे व खराब पुर्वानुभवाची बाब दिनांक २४/०५/२०२३ रोजी, निदर्शनास आलेली आहे. त्यानुसार यथावकाश त्यांच्या निविदा रदद करून पुढील कार्यवाही करण्यांत आलेली आहे. चौकशी समितीचे निष्कर्श हे शासकीय संपादनाचे सर्वसाधारण तत्वांचे विसंगत आहे, कारण निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बनावटीकरणाची बाब निदर्शनास आल्यानंतर त्यावेळी कार्यवाही करण्याची जाबाबदारी संबंधीत CBO व नियंत्रण अधिकारी यांची आहे. सदर बाब प्रकल्पाचे निदर्शना आलेमुळे आज जवळपास ७ महिन्यांतर १९/०१/२०२४ रोजी, मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट पुणे यांनी मे.शेती क्रांती यांच्या राज्यातील सर्व निविदा नाकारण्याबाबत पत्र निर्गमित केले आहे. यावरून हे निदर्शनास येते की, चौकशी समितीचे निष्कर्श हे प्रकल्पातील कार्यपध्दती व सर्वसाधारण निवड प्रक्रियेचे धोरण यांचेशी अत्यंत विसंगत आहे. यामुळे सदरचे चौकशी समितीचे निष्कर्शाबाबत पुर्नपडताळणी करणे आवश्यक आहे. |
| ६ | आर्थिक निविदा उघडल्यानंतर आठ दिवसाच्या आत पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना पुरवठा आदेश न देता तब्बल पाच आठवडयांनी फेर निविदा करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. सदर झालेली दिरंगाई हि विशिष्ट हेतूसाठी करण्यांत आली असल्याची दाट शक्यता आहे. | दिनांक २८/०४/२०२३ रोजी, निविदा उघडण्यांत आली आहे. तथापी दिनांक २३/०२/२०२३ रोजी, मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट पुणे व संपादन तज्ञ PCMU यांनी दिलेल्या सुचने नुसार CBO यांचे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट मंजुर झाल्याशिवाय पुरवठा आदेश निर्गमित करू नयेत अशा स्पष्ट सुचना आहेत. संपादन प्रक्रिया, बँक लोन व ग्रॅन्ट ॲग्रीमेंट या तिन्ही प्रक्रिया संमातर सुरू असतात. तथापी ग्रॅन्ट ॲग्रीमेंट झाल्या शिवाय पुरवठा आदेश निर्गमित करू नये अशा सुचना असल्यामुळे पुरवठा आदेश देण्यांत आला नव्हता, तसेच CBO चे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट व FPP मधील दुरूस्तीची कार्यवाही सुरू होती. दरम्यनचे काळात CBO यांनी पुरवठादार यांचे यापुर्वीच्या प्रकल्पांची शहानिशा केली त्यात त्यांचा अनुभव व मशिनरीच्या निकृष्ठ दर्जाबाबत माहिती मिळाली, तसेच दिनांक २४/०५/२०२३ रोजी, सदरचे उलाढाल प्रमाणपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आले. यामुळे पुरवठा आदेश निर्गमित न करता पुर्ननिविदेचा निर्णय घेण्यांत आला आहे. यात कोणताही विशिष्ठ किंवा चुकीचा हेतू ठेवण्यांत आलेला नाही. |

C) **मा. समिती अध्यक्ष तथा नोडल अधिकारी, PIU(Agri) यांचे दिनांक १४/०७/२०२३ रोजीचे पत्र क्रं. २१२० मधील शिफारसीबाबत विश्लेशन :-**

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | चौकशी शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | उपरोक्त प्रकरणी विभागीय संपादन अधिकारी श्री. सुनिल शेलार यांची भुमिका संशयास्पद असून संबंधीत सहभागी निविदाधारक सोबतचे संभाषण हि गंभिर स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्यांना सेवेतून वाढून त्यांचे नांव काळया यादीत टाकावे. | मी जर दोषी असेल तर १०० टक्के मला शिक्षा झालीच पाहिजे. परंतू मी दोषी आहे किंवा नाही, याची परिपूर्ण खात्री पक्की झाल्यानंतर कार्यवाही होणे अपेक्षित आहे. तथापी सदरच्या शिफारशी बाबत खालील प्रमाणे अक्षेप नोंदवित आहे, कृपया अवलोकन व्हावे.<br>१) सदरचा चौकशीसाठी मला दिनांक १२/०७/२०२३ रोजी, तक्रार अर्जाचे अनुषंगाने खुलासा सादर करणेबाबत सायंकाळी ६.२७ वाजता पत्र प्राप्त झाले. आणि दिनांक १३/०७/२०२३ रोजी, दुपारी ३.०० वाजता खुलासा सादर करण्याच्या सुचना देण्यांत आल्या. सदर कामी मला केवळ ५ तासांचा कामकाजीय वेळ देण्यांत आला.<br>२) माझ खुलासा दिनांक १३/०७/२०२३ रोजी, दुपारी १.३० वाजता, मा.समिती अध्यक्ष यांचेकडे मी सादर केले नंतर त्याच दिवशी चौकशी समितीने अहवाल अंतिम करून मा.प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे यांचेकडे सादर केला. तथापी खुलाशत नमुद महत्वपूर्ण बाबींचा विचार चौकशी समितीने केला नाही. सदरचा अहवाल दुपार सत्रातील कार्यालयीन कामकाजाच्या शिल्लक असलेल्या ५ तासांत अंतिम करण्यांत आला.<br>३) सदर प्रकारणी मी दोषी आहे असे ग्रहित धरूनच चौकशी सुरूवात करण्यांत आली होती. आणि तीचा शेवट माझ्या सेवा समाप्त करणे हे पुर्वीच निर्धारित करण्यांत आले होत. सदरची चौकशी केवळ ही एक सोपस्कार म्हणून राबविण्यांत आली आहे. अशी माझी धारणा आहे.<br>४) उपरोक्त प्रकरणी माझी भुमिका कशाप्रकारे संशयास्पद आहे, हे मला कधही अवगत करण्यांत आले नाही.<br>५) दिनांक १३/०६/२०२३ रोजी, मला खुलासा सादर करण्यासाठी निर्गमित केलेल्या पत्रात कोठोही कोणत्याही प्रकारच्या दुरध्वनी संभाषणाचा उल्लेख नाही. किंवा कोणत्याही प्रकारचे दुरध्वनी संभाषण मला पडताळणीसाठी उपलब्ध करून देण्यांत आले नाही.<br>६) चौकशी दरम्यान मा. सर्वोच्या न्यायालयाने कर्मचारी यांचे विरूध्द तक्रारींची चौकशी दरम्यान पाळावयाच्या नैसर्गिक तत्वांचे कोठेहे पालन करण्यांत आलेले नाही.<br>७) विशेषत : नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालय यांनी UMC TECHNOLOGIES PRIVATE LIMITED |

| | | |
|---|---|---|
| | | VS FOOD CORPORATION OF INDIA AND ANR. (CIVIL APPEAL NO. ३६८७ OF २०२०) अन्वये संपूर्ण भारतासाठी घालून दिलेल्या आदर्श कार्यपध्दतीचा अवलंब न करता माझेवर नांव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यांत आली आहे. जी अन्यायकारक आहे.<br>८) सदरच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान माझे नैसर्गिक अधिकार व मा. सार्वोच्य न्यायालयाचे विविध न्याय निवाडे आणि संविधानिक तरतूदी यांचा मोठया प्रमाणावर उल्लंघन व अवमान करून सदरची अन्यायकारक व एकतर्फी आणि पक्षपाती कार्यवाही करण्यांत आली आहे.<br>९) मी एक कंत्राटी कर्मचारी आहे, आम्हाला न्याय मागणीसाठी सुध्दा मर्यादा आहेत, यामुळे याच धर्तीवर "Easy to Hire and Easy to Fire" या अमानुष प्रथेप्रमाणे माझ्या समाप्त करण्यांत आलेल्या आहेत. |

D) **मा. प्रमुख, PIU (Agri) यांचे दिनांक १४/०७/२०२३ रोजीचे पत्र क्रं. २१३४ मधील शिफारस**

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | सदरच्या समितीने दिनांक ३०/०६/२०२३ रोजी विभागीय अंमबलजावणी कक्ष, पुणे येथे तसेच दिनांक ११/०७/२०२३ रोजी जिल्हा अंमबलजावणी कक्ष, सोलापूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन संपादन प्रक्रियेच्या दस्ता ऐवजाची तपासणी केली असून त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. चौकशी अहवालावरून **संपादन प्रक्रियेत अक्षम्य दिरंगाई** झाल्याचे तसेच **आर्थिक विश्लेषनानंतर पुरेशी चौकशी न करता न्युनतम किंमतीची निविदा रदद करून पुन्हा निविदा काढण्याबाबत झालेला निर्णय संशयास्पद असून त्यातील श्री. सुनिल शेलार यांची भुमिका चुकीची आहे.** तसेच **श्री. शेलार यांचे सचोटी व चारित्र्य संशयास्पद आहे**. | **संपादन प्रक्रियेत अक्षम्य दिरंगाई :-**<br>१) दिनांक १४/०७/२०२३ अखेर राज्याच्या एकुण संपादन प्रक्रियेच्या प्रगती अहवलाचे अवलोकन केल्यास निदर्शनास येईल की, राज्यतील पहिल्या TOP ३ यांचे यादीमध्ये पुणे विभाग व जिल्हयांचे बाबतीत सोलापूर चे नांव आहे.<br>२) दिनांक २३/०२/२०२३ रोजी, मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट पुणे व संपादन तज्ञ PCMU यांनी दिलेल्या सुचने नुसार CBO यांचे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट मंजुर झाल्याशिवाय पुरवठा आदेश निर्गमित करू नयेत अशा स्पष्ट सुचना आहेत. त्यानुसार पुरवठा आदेश पर्यंतची प्रकक्रिया अंतिम करण्यांत आली होती. संपादन प्रक्रिया, बँक लोन व ग्रॅन्ट ॲग्रीमेंट या तिन्ही प्रक्रिया संमातर सुरू असतात. तथापी ग्रॅन्ट ॲग्रीमेंट झाल्या शिवाय पुरवठा आदेश निर्गमित करू नये अशा सुचना असल्यामुळे पुरवठा आदेश देण्यांत आला नव्हता, तसेच CBO चे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट व FPP मधील दुरूस्तीचे कार्यवाही सुरू होती.<br>३) **आर्थिक विश्लेषनानंतर पुरेशी चौकशी न करता न्युनतम किंमतीची निविदा रदद करून पुन्हा निविदा काढण्याबाबत झालेला निर्णय संशयास्पद असून त्यातील श्री. सुनिल शेलार यांची भुमिका चुकीची आहे. :-** दरम्यानचे काळात संबंधीत तक्रारदार यांचे कंपनीबाबत व कागदपत्रांबाबत |

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | बनावटीकरणाची बाब समोर आल्याने CBO यांनी पुर्ननिविदा करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच CBO यांनी सोलापूर येथे दिनांक ११/०७/२०२३ रोजी, चौकशी दरम्यान सादर केलेले निवेदन व पुरावे विचारात घेण्यांत आलेले नाहीत. त्यातील कांही ठळत मुददे पुढील प्रमाणे आहेत, जे चौकशी समितीने निष्कर्ष नोंदविण्यापूर्वी विचारात घेणे आवश्यक होते.<br>- कंपनीचे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट अदयाप मंजुर नाही<br>- L1 आलेली निविदा ही मंजुर FPP पेक्षा १० लक्ष ने अधिक असून सदरचा भार CBO उचलू शकत नाही.<br>- मे. शेतीक्रांती फुड मशिनरी यांचे साहित्यांचे दर्जाबाबत अनेक तक्रारी आहेत.<br>- मे. शेतीक्रांती यांनी निविदेत सहभागी होण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर केलेली आहेत.<br>वरिल प्रमाणे वस्तुस्थिती संपादन समितीच्या समोर होती, यास्थितीमध्ये संपादन समितीने जो निर्णय घेतला आहे तो सर्वानुमते घेण्यांत आलेला आहे. सदरचा निर्णय जर खरोखरच चुकीचा असेल तर त्याचे स्पष्टीकरण चौकशी समितीच्या अहवालात नमुद करणे आवश्यक असून, यासाठी श्री.सुनिल शेलार हे एकटेच कशाप्रकारे जबाबदार आहेत, याचे निष्कर्श चौकशी अहवालात नमुद करण्यांत आलेले नाहीत.<br>**श्री. शेलार यांचे सचोटी व चारित्र्य संशयास्पद आहे**. :- माझे सचोटी व चारित्र्याची पडताळणी केवळ श्री. नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी या एका बनावट व बोगस पुरवठादार यांचे तक्रारीवरून होऊ शकत नाही. यासाठी मागील एक वर्षात राज्यातील सर्वाधीक लक्षांक असलेला पुणे विभाग हा कायम महाराष्ट्रात प्रथम स्थानावर ठेवण्यासाठी जे अथक परिक्षम घेतले याची जानिव कोणीच ठेवली नाही. माझे सचोटी व चारित्र्याचे प्रमाण आहे की, मागील एक वर्षात एकाही CBO ची तक्रार नाही, उलट पक्षी सर्व CBO हे माझे कामकाज व मार्गदर्शनाने समाधानी आहेत. माझे सेवा समाप्तीचे निर्णय हा CBO यांना सुध्दा उचित वाटलेला नाही. तसेच माझे नियंत्रण अधिकारी यांनी माझे वार्षीक कामकाजाचे केलेले उत्युकृष्ठ (A+) मुल्यांकन सुध्दा विचारात घेण्यांत आलेले नाही.<br>**सचोटी :- अ.क्रं. B मधील मुददा क्रं. १ चे कृपया अवलोकन व्हावे, त्याव्दारे माझे कामाचे सचोटी निदर्शनास येईल.**<br>**चारित्र्य :-** माझे नियंत्रण अधिकारी यांनी माझे वार्षीक कामकाजाचे |

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | केलेले उत्युकृष्ठ (A+) मुल्यांकनन, पुणे विभागातील माझे सर्व CBO यांचे कामकाजाबाबत व मार्गदर्शनाबाबत समाधानकारक अभिप्राय यावरून माझे चारित्र्याची पडताळणी होणे अपेक्षित आहे. ना की कोणा एका बनावट कागदपत्रे सादर करण्या-या तक्रारदाराचे खोटया तक्रारी वरून. |
| २ | सदर प्रकरणी विभागीय संपादन अधिकारी श्री.सुनिल शेलार हे जिल्हा संपादन समितीचे संपादन विषयाचे तज्ञ सदस्य म्हणून निविदा रदद करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी कोणती काळजी घ्यायला ही होती याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक होते. समितीने योग्य चौकशी अंती निर्णय घेण्याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक होते. | सदरचा निर्णय हा परिपूर्ण विचार करून, जिल्हास्तरीय बैठकीत समिती सदस्य व CBO या सर्वांची चर्चा करून घेण्यांत आलेला आहे. त्याची थोडक्यात पार्शभुमि खालील प्रमाणे आहे :-<br>१) माहे जोनवारी २०२३ व मार्च २०२३ दरम्यान पुणे विभागातील मशिनरीसाठी बहुतांश निविदा आम्ही प्रसध्दि केल्या परंतू त्यामध्ये मशिनरी पुरवठादार यांची अग्रिमाचे मागणीमुळे ते सहभागी होत नव्हते. यापुर्वीच्या प्रकल्पस्तरावरील विविध बैठकीमध्ये यावर चर्चासुध्दा झाली होती, तसेच CBO च्या निविदामध्ये जास्तीत जास्त निविदाधारक सहभागी होतील या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्याच्या तोंडी सुचना मा.अतिरिक्त प्रकल्प संचालक, पुणे यांनी दिलेल्या होत्या. त्यानुसार RIU पुणे येथील श्री.संदिप वर्पे (पुरवठा व मुल्यसाखळी तज्ञ) यांनी श्री.नितीन मिसाळ यांचा माहे मार्च २०२३ मध्ये माझेशी संपर्क करून दिला. श्री.मिसाळ हे एक चांगले पुरवठादार असून त्यांनी यापुर्वी खुप चांगले काम केले आहे. आपल्या विभागातील निविदा मध्ये ते विना अग्रिमच्या अटीनुसार सहभागी होत आहेत असे सांगीतले. त्यानुसार सदर पुरवठादार हे पुणे विभागातील CBO यांचे निविदामध्ये सहभागी होत होते.CBO यांची संपादन प्रक्रिया जलद गतीने व विहित वेळेत पुर्ण होऊन पुणे विभागाचा आलेख महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर राहील याचा शुध्द हेतूने त्यांचेशी आम्ही व आमच्या CBO यांनी समन्वय साधत होते.<br>२) दिनांक ११/०५/२०२३ रोजीचे बैठकीमध्ये श्री.नितीन मिसाळ यांचे बाबत कांही धक्कादायक खुलासे आमचे समोर आले. श्री. मिसाळ यांनी अहमदनगर जिल्हयातील CBO यांना MACP प्रकल्पादरम्यान बोगस मशिनरीचा पुरवठा करून त्यांची फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली होती. तसेच निविदा प्रक्रियेत सुध्दा ते बनावट कागदपत्रे सादर करत असल्याची अत्यंत धक्कादायक बाब निदर्शनास आली. याबाबत जिल्हास्तरीय समितीमध्ये चर्चासुध्दा झालेली आहे.<br>३) दिनांक १८/०५/२०२३ रोजी, श्री.मिसाळ हे DIU, सोलापूर कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी त्यांना सदर बाबीची |

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | विचारणा करून मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करण्याची सुचना केली असता त्यांनी माझेवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याच दिवशी दि. १८/०५/२०२३ राजी, सायंकाळी ८.४५ वाजता श्री.मिसाळ यांनी माला माझे दुरध्वनीवर संपर्क साधुन प्रलोभन देण्याचा प्रयत्न सुध्दा केला. तसेच त्यांचा मोठा भाऊ याचेशी चर्चा करण्यासाठी दबाव निर्माण केला. तथापी सदर कामी त्यांचे प्रलोभन व दबावास बळी न पडता पादर्शक प्रक्रिया राबविली तसेच **“मी माझे विभागात अशा प्रकारे कोणाला मदत करत नाही”** हे सुध्दा स्पष्ट शब्दांत खडसावून सांगीतले होते.<br>४) दिनांक २४/०५/२०२३ रोजी, अहमदनगर जिल्हयास्तरीय संपादन समितीच्या बैठकीमध्ये भाग्यतारा शेतकरी उत्पादक कंपनीचे निविदा प्रक्रिया पुर्वमान्यता प्रक्रियेदरम्यान संबंधीत CBO यांनी श्री.मिसाळ प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांचे टर्नओव्हर प्रमाणपत्राची पडताळी केली असता ते बनावट असल्याचे निदर्शनास आले. दिनांक २४/०५/२०२३ रोजी, दुपारी १२.५७ वाजता श्री.मिसाळ यांनी मला दुरध्वनी करून सदरचे प्रमाणपत्र पडतळाणीचे कार्यवाहीबाबत दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सदरच्या संभाषनामधील श्री.मिसाळ यांनी उददगारलेले कांही महत्वपुर्ण मुददे पुढील प्रमाणे - **“तुम्ही आमचे प्रामाणपत्र पडताळणी करून योग्य केले नाही, CA ने आमच्यवर ४२० ची केस केली, आमच्यावर ४२० लगेल, मी मंत्रालयातून ती मॅनेज करेल, मला कांही फरक पडत नाही अशा केस ने, काय होईल शेती क्रांती Black List होईल, दुस-या कंपन्या घेऊन् आम्ही उतरू, बनावट प्रमाणपत्र दयायला मला प्रकल्पातील व्यक्तीने सांगीतले होते म्हणून मी दिले आहे, माझा मोठा भाऊ** (राजकिय व्यक्तीचे नांव गोपनिय ठेवत आहे*) **यांचा PA आहे, स्थानिक आमदार आणि प्रकल्पातील वरिष्ठ अधिकारी** (नांवे गोपनिय ठेवत आहे*) **आमच्या रोजच्या बैठकीतील आहेत, माझे लई मोठे राजकिय संबंधन आहेत, CBO ला सांगा ई-मेल चुकून गेलता म्हणून सांगायला, हे प्रकरण तुम्ही मिटवून दया, नाहीतर लई अवघड होईल तुमच”**<br>५) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, पुर्ननिविदेचा निर्णय घेतेवेळी खालील प्रमाणे ठळक व स्पष्ट मुदयांवर संपादन समितीत चर्चा झाली, होऊनच झाला आहे.<br>- कंपनीचे ग्रॅन्ट ॲग्रीमेंट अदयाप मंजुर नाही |

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | - L१ आलेली निविदा ही मंजुर FPP पेक्षा १० लक्ष ने अधिक असून सदरचा भार CBO उचलू शकत नाही.<br>- मे. शेतीक्रांती फुड मशिनरी यांचे साहित्यांचे दर्जाबाबत अनेक तक्रारी आहेत.<br>- मे. शेतीक्रांती यांनी निविदेत सहभागी होण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर केलेली आहेत.<br>६) त्यानुसार CBO यांची फसवणूक होऊ नये व शासकीय निधीचा अहपहार होऊ नये याबाबी डोळयासामेर ठेऊनच सदरचा निर्णय घेण्यांत आला असून सदरचा निर्णय हा प्रकल्पाच्या हितात असून यामुळे सदरचा निर्णय हा योग्य व उचित पध्दतीने घेण्यांत आलेला आहे.<br>७) श्री. मिसाळ यांनी सादर केलेल आर्थिक उलाढाल प्रमाणपत्रे हे बनावट आहे याची खात्री पटल्यानेच प्रकल्पाने दिनांक १९/०१/२०२३ रोजी, श्री.मिसाळ प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांच्या निविदा नाकारण्याबाबत सुचना निर्गमित केलेल्या आहेत. |
| ३ | खरेदी प्रक्रिया रदद करण्याच्या CBO च्या मागणीस तात्काळ मान्यता देण्यापूर्वी निविदा धारकाने मागीतलेली किंमत बाजारभावापेक्षा अधिक आहे किंवा कसे, याची तपासणी न करता<br>तसेच एकदा आर्थिक विश्लेषन झाल्यानंतर पुरवठादाराच्या तांत्रिक दर्जाबाबत शंक व्यक्त करणे अयोग्य असल्याबाबत CBO ला स्पष्ट सांगणे आवश्यक होते. तसे न करता प्रक्रिया रदद करून पुन्हा निविदा मागविण्यास मान्यता देणेबाबत केलेली कार्यवाही आणि त्यातील श्री. शेलार यांची भूमिका चुकीची आहे. | १) मशिनरीचे दरांबाबत CBO यांनी स्थानिक पुरवठादार व राज्याबाहेरील बरेच पुरवठादार यांचेशी चर्चा केल्याचे संपादन समितीच्या बैठकी दरम्यान सांगितलेले आहे. तथापी श्री.नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांचे मशिनरीचे दर्जाबाबत ७ ते ८ CBO यांचे अभिप्राय आणि त्यांचे बनावट आर्थिक उलाढाल प्रमाणपत्राचे सबळ पुरावे पटलावर समोर असून सुध्दा CBO यांचे पुर्ननिविदेच्या निर्णयाबाबत शंका उपस्थित करणे संयुक्तीक नव्हते. म्हणूनच पुर्ननिविदेस मंजुरी प्रदान करण्यांत आली आहे.<br>२) श्री.नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांचे मशिनरीचे दर्जाबाबत ७ ते ८ CBO यांचे अभिप्राय आणि त्यांचे बनावट आर्थिक उलाढाल प्रमाणपत्राचे सबळ पुरावे समोर असल्यामुळे पुर्ननिविदेस मान्यता देण्यांत आली. तसेच याबाबत समर्पक बाब म्हणजे स्वत: प्रकल्पानेसुध्दा श्री. मिसाळ यांनी सादर केलेल आर्थिक उलाढाल प्रमाणपत्रे हे बनावट आहे याची खात्री पटल्यानेच प्रकल्पाने दिनांक १९/०१/२०२३ रोजी, श्री.मिसाळ प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांच्या निविदा नाकारण्याबाबत सुचना निर्गमित केलेल्या आहेत. |
| ४ | त्याशिवाय CBO ने श्री.शेलार यांची पाठराखन करणारे दिलेले निवेदन | १) जागतिक बँकेमार्फत कर्ज घेऊन कार्यान्वीत करण्यात आलेल्या लोक कल्याणकारी प्रकल्पामध्ये अनियमिता किंवा |

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | तसेच तक्रारदाराने व्हॉटसअॅप वरून सादर केलेले फोन संभाषणाचे ध्वनीमुद्रण यावरून श्री.शेलार यांची भूमिका गैर असल्याचे स्पष्ट होते. अशा गैर कृत्यांना प्रकल्पात प्रकल्पात थारा नाही आणि भविष्यात कोणीही असे कृत्य करण्याचे धाडस करू नये हा संदेश जाणे आवश्यक आहे. म्हणून श्री. सुनिल शेलार संपादन अधिकारी यांचे सेवा त्वरीत संपुष्टात आणाव्यात. त्यासाठी मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेस त्वरीत तसे कळवावे अशि विनंती आहे. तसेच श्री.शेलार यांचे नांव काळया यादीत टाकण्याचे निर्देश सेवा पुरवठादार संस्थेस दयावेत ही विनंती. | गैरकृत्य किंवा भ्रष्टाचार यांना अजिबाबत थारा नसला पाहिजे, ही अत्यंत आर्दश भूमिका आहे, याबाबत अक्षेप नोंदविण्याचे कारण नाही. परंतू कोणतेही गैरकृत हे एकतर्फी निष्काशीत करणे उचित नाही.<br>२) CBO यांनी दिलेले उत्तर हे त्यांचे स्वत:चे अभिप्राय आहेत. यामुळे त्यातून माझी भूमिका उचित असल्याचे ते सांगत असतील तर ते माझी पाठराखन करताय असे समजणे उचित वाटत नाही.<br>३) वरिल प्रमाणे, संपूर्ण प्रकारणाचा सर्वंकष अभ्यास केल्यास हे स्पष्ट निदर्शनास येते की, संपूर्ण प्रक्रिया ही केवळ संपादन अधिकारी कशा प्रकारे दोषी आहेत हे दर्शविण्यासाठी विविध तर्क आणि निशिक्षण आणि निष्कर्शाव्दारे करण्यांत आले आहे. परंतू तक्रार अर्जात नमुद कोणताही स्पष्ट असा आरोप किंवा दोष सिध्द करण्यांत आलेला नाही. **<u>तसेच तक्रारदार यांचे चारित्र, सत्यता शेधण्याचा कोठेही प्रयत्न झालेला नाही.</u>**<br>४) केवळ तक्रारदार यांनी जे कांही कथीत कॉल रेकॉर्डीग सादर केल्या आहेत, त्याआधारवर पुर्वग्रह दुषीत दृष्टीकोण निर्माण झाला असून त्यानतूनच संपूर्ण कार्यवाही घडुन आली आहे.<br>५) तथापी ज्या संभाषणाचा उल्लेख करण्यांत आला आहे, असे कोणतेही संभाषण मला पडताळाणीसाठी किंवा खुलासा नोंदविण्यासाठी देण्यांत आलेले नाही.<br>६) सदरच्या संभाषणामधील आवाज हा माझाच आहे की कोणा दुस-याचा याची खात्री देखिल करण्यांत आलेली नाही.<br>७) माझे विरूध्द वापरण्यांत आलेले सदरचे कथित संभाषणे हे माझे पुर्व संमत्तीशिवाय आहेत, भारतिय संविधानाचे परिच्छेद २१ अन्वये प्रदान केलेल्या गोपनियतेच्या अधिकारांचा येथे भंग झालेला आहे.<br>८) दुरध्वनी संभाषणाबाबत सत्यता पडताळणी, त्याची हाताळणी, दोष सिध्दी, गोपनियतेच्या अधिकारांचे उल्लंघनास प्रतिबंध याबाबत निर्गमित मर्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने कार्यवाही झालेली नाही किंवा त्याचे पालन ही करण्यांत आलेले नाही.<br>९) कोणत्याही व्यक्तीच्या चारित्र्याची पडताळणी केवळ कॉल रेकॉडींग वरिल संभाषणावरून होऊ शकत नाही. प्रत्येक संभाषणातील प्रत्येक उददगार आणि त्यामागील हेतू शोधण्यांत आलेला नाही. |

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | | १०) मी दोषी नाही, मी कधीही दुशित हेतूने काम केले नाही, तक्रारदाराने तक्रारीत नमुद केलेल्या कोणत्याही आरोपाची सध्दि झालेली नाही किंबहूना ती होऊ शकत नाही कारण तक्रारीतील सर्व आरोप हे खोटे व निराधार आणि तथ्यहीन आहेत. यासाठी सक्षम पुरावे, सत्यपींत साक्षीदार माझेकडे उपलब्ध आहेत.<br>११) माझे चारित्र आणि सचोटीचा निर्णय हा केवळ कॉल रेकॉर्डीगवरच घ्यायचा असेल तर, श्री. मिसाळ व सदर प्रकरणाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी व CBO यांचे आज अखेर पर्यंत दुरध्वनी संभाषणाचे एकुण ४० कॉल रेकॉर्डीगचा CDR मी उपलब्ध करून घेतलेला आहे. आवश्यकतेनुसार आपणास ते उपलब्ध करून देता येतील. यावरून हे निदर्शनास येईल की, श्री.मिसाळ यांचा धुर्त व दुषित हेतूस आम्ही सहकार्य न केल्यामुळे त्यांनी महाभारतामधील शकुनी प्रमाणे कारस्थान रचून माझी प्रतिमा मलिन करण्यांचा प्रयत्न केला आहे. |
| ५ | तसेच M/s शेतीक्रांती फुड मशिनरी यांनी इतर संस्थेच्या संपादन प्रक्रियेमध्ये सादर केलेले चुकीच्या दस्त ऐवज दिलेले असल्यास त्याची तपासणी करून तथ्य आढळल्यास M/s शेतीक्रांती फुड मशिनरी यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही सुरू करण्याबाबत विभागीय कृषि सहसंचालक यांना कळविण्यांत येत आहे | M/s शेतीक्रांती फुड मशिनरी यांनी निविदेत बनावट व बोगस कागदपत्रे सादर केल्यामुळेच त्यांची निविदा रदद करण्यांत आली आहे. तथापी सदर बाबीशी प्रकल्प सहमत आहे. यामुळे दिनांक १९/०१/२०२४ रोजी, तक्रादार श्री.मिसाळ यांच्या निविदा नाकारण्याबाबत प्रकल्पाने पत्र निर्गमित केले. अशा बनावट कागपत्रे सादर करणारे तक्रारदार यांचे तक्रार अर्जाबाबत चौकशी समितीने चुकीच्या पध्दतीने विश्वास ठेऊन माझेवर कार्यवाही केली आहे. माझेवर झालेली कार्यवाही ही केवळ चुकीची तक्रार व त्यातील चुकीची निराधार आरोप आंणि असंविधानीक पध्दतीने वापर केलेल्या कथित कॉल रेकॉर्डीगच्या आधारे करण्यांत आलेली आहे. |

E) **<u>मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, PCMU यांचे दिनांक २०/०७/२०२३ रोजीचे पत्र क्रं. १२९३ मधील शिफारस</u>**

| अ.क्रं. | चौकशी समितीच्या शिफारशी | शिफारशी विरूध्द माझे निवेदन व त्याबाबत पुराव्यासह स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल शेलार यांची नेमणुक प्रापण अधिकारी, विभागीय अंमबलजावणी कक्ष, पुणे येथे आपले संस्थे मार्फत करण्यांत आली आहे. श्री.शेलार यांचे विरूध्द प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी समितीने श्री. सुनिल शेलार यांना दोषी ठरविले | PCMU हे प्रकल्पाचे केद्रीय तथा प्रमुख कार्यासन आहे. जिल्हा / विभाग स्तरावरून प्राप्त शिफारशींबाबत खात्री करून निर्णय घेणे आवश्यक होते. सदर प्रक्रियेत सहभागी असलेले सर्व अधिकारी हे प्रशासकीय सेवेतील वर्ग १ दर्जाचे अधिकारी आहेत. आम्ही केवळ कंत्राटी कर्मचारी अहोत. आमचे जे कांही तक्रारी असतीत त्यावर कार्यवाही होणे आवश्यक आहे, परंतू सदर प्रकरणी कोणास दोषी सध्दि करण्यापूर्वी त्याला त्याचे म्हणने मांडण्याची, पुरव्यांची पडताळाणी करण्याची, उलट तपासणीची एखादी संधी देणे आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | असून, त्यांच्या सेवा तातडीने संपुष्टात आणाव्यात तसेच त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ठ करणेबाबत शिफारस केली आहे. वरिल शिफारशी विचारात घेता आपणास निर्देशित करण्यांत येते की, श्री.सुनिल शेलार, प्रापण अधिकारी, विभागीय अंमलबाजावणी कक्ष, पुणे यांच्या सेवा तात्काळ संपुष्टात आणून त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ट करून या कार्यालयास अवगत करावे. | आहे. याबाबत कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत मा. उच्च न्यायालयाचे कांही दिशादर्शक तत्त्वे खाली नमुद करत आहे,<br>मा.हैद्राबाद उच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, The Hyderabad High Court has made it clear that in the matter of disciplinary proceedings a differential treatment cannot be meted out to an accused contract employee from regular employees of an organization. “Even if the petitioner accused is treated as a purely temporary contract employee, she/he is entitled to protection under Article ३११ (२) of the Constitution as in the case of permanent government servants if her/his services are sought to be terminated on the ground of misconduct.” त्यानुसार पारदर्शक, निपक्षपाती व प्रशासकीय / कामगार कायदयाचे नियमानुसार चौकशी करण्यांत आलेली नाही.<br>तसेच नांव काळया यादीत समाविष्ठ करण्याबाबत मा.सर्वोच्य न्यायालय यांनी दिलेल्या Landmark Judgment चे वर्णन खालील प्रमाणे सादर करीत आहे.<br>I) Supreme Court: The bench of SA Nazeer* and BR Gavai, JJ has held that a show cause notice constituting the basis of a blacklisting order must spell out clearly the intention on the part of the issuer of the notice to blacklist the noticee. Such a clear notice is essential for ensuring that the person against whom the penalty of blacklisting is intended to be imposed, has an adequate, informed and meaningful opportunity to show cause against his possible blacklisting.<br>ज्या तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने मला दोषी ठरविण्यांत आले आहे, त्यांच्या राज्यातील निविदा नाकारण्याबाबत आपण स्वत दिनांक १९/०१/२०२४ रोजी पत्र निर्गमित केले आहे. म्हणजे तुम्हास त्यांची बनावट कागदत्रे निदर्शनास आल्यास तुम्ही त्यांच्या निविदा रदद करण्याचा निर्णय घेतला तो योग्य आहे. परंतू सदर बनावट कागपत्रांमुळेच आम्ही संबंधीत निविदाकार यांच्या निविदा रदद केल्या आहेत. तथापी सदर प्रकारणी मला दोषी सिध्द करण्याचे नेमके कारण अस्पष्ट आहे.<br>कोणत्याही व्यक्तीला शिक्षा देण्यापूर्वी त्याचा दोष काय आहे, कोणत्या पुराव्या आधारे त्याला शिक्षा दिली जात आहे, काय शिक्षा दिली जात आहे हे कळविणे अपेक्षित आहे. परंतू सदरच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मला माझा दोष आणि पुरावे यांची कोणतही माहिती कसल्याहीप्रकारे कोणीसुध्दा दिली नाही.<br>माझे विरूध्द केलेल्या चौकशीचा अहवाल सुध्दा मला माहिती अधिकारात अर्ज करून उपलब्ध करून घ्यावा लागला आहे. |

**वरिल प्रमाणे, अ.क्रं. A, B, C, D व E मध्ये नमुद केलेल्या विश्लेशनाचे अधिन राहून खालील प्रमाणे, तक्रार अर्ज दाखल करत आहे, कृपया अवालोकन व्हावे, ही विनंती.**

अ) **चौकशी समितीने अधिकारांचा गैरवापर केले बाबत :-**

i) चौकशी दरम्यान नैसर्गिक तत्वांचे पालन करण्यांत आले नाही.

ii) कोणतेही दोषारोप पत्र निर्गमित करण्यांत आलेले नाही.

iii) संपादन अधिकारी यांचेवर तक्रार अर्जात नमुद केलेप्रमाणे कोणताही आरोप सिध्द करण्यास चौकशी समितीस अपयश आले आहे. यामुळे विविध तर्क व कॉल रेकॉर्डींगचा अनाधिकृत आधार घेत संपादन अधिकारी यांना दोषी सिध्द करण्यात आले आहे.

iv) चौकशी दरम्यान तक्रारदारने सादर केलेल्या साक्षी पुराव्यांची पडताळणी व उलट पतासणी करण्यांत आलेली नाही.

v) कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा समाप्ती बाबत मा. न्यायालय व प्रशासकीय आदर्श पध्दती यांचे पालन करण्यांत आलेले नाही.

vi) कॉल रेकॉडींग बाबत ईलेक्टॉनीक पुरावे (Electronic Evidance) हाताळणी, पडताळणी व गोपनियतेच्या अधिकारांचे उल्लंघनास प्रतिबंध या मार्गदर्शक तत्वांचे पालन झाले नाही.

vii) विशेशत : नांव काळया यादीत टाकणेबाबत मा.सर्वोच्य न्यायालयाचे Landmark Judgment चे मोठया प्रमाणावर उल्लंघन झाले आहे.

viii) केवळ मी एक कंत्राटी कर्मचारी आहे, आम्हाला न्याय मागणी किंवा नोकरीतील संरक्षणाच्या मर्यादा आहेत, म्हणून केवळ प्रकल्पातील इतर अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबर निर्माण करण्यासाठी माझा बळी देण्यांत आलेला आहे.

आ) **चौकशी समितीच्या चुकांमुळे प्रकल्पाच्या निधीचा अपहार झाले बाबत :-**

I) चौकशी समितीने तक्रारदार श्री.नितीन मिसाळ, प्रो.पा. शेती क्रांती फुड मशिनरी यांचे तक्रारीचे अनुषांगाने संपादन अधिकारी यांना कसे दोषी ठरवा येईल यावर इतके परिश्रम घेतले आहेत की, सदरच्या बनावट तक्रारदारामुळे प्रकल्पाचे कांही नुकसान होऊ शकेल का कसे, याकडे त्यांनी लक्ष दिले नाही. यामुळे धाराशिव व पभरणी जिल्हयात सदरच्या पुरवठादार यांना निविदा प्रक्रियेत पात्र करण्यांत आले असून, परभणी येथील श्री वाल्मीकेश्वर शेतकरी उत्पादक कंपनीव्दारे मे. शेतीक्रांती फुड मशिनरी यांना दिनांक ०४/०९/२०२३ अन्वये, रू. १८,००,०००/- चे देयक अदा झाले आहे.

II) वरिल प्रमाणे प्रकल्पातील निधीचा झालेल्या अपहारास प्रत्यक्षात कोण जबाबदार आहे, याची शहानिशा करून संबंधीतावर जबाबदारी निश्चीत करण्यांत येणे आवश्यक आहे.

इ) **तक्रारदार यांचे विरूध्द माझे कार्यकाळत आम्ही केलेल्या कार्यवाहीमुळे प्रकल्पाचे साधलेले हित :-**

i) पुणे विभागात एकुण ४ CBO यांचे मशिनरी साठी संबंधित बनावट व बोगस पुरवठादार यांनी निविदा भरल्या होत्या. तथापी सदरची बाब प्रकर्षाने निदर्शनास आल्यामुळे संबंधीत श्री.नितीन मिसाळ, प्रो.प्रा. शेती क्रांती फुड मशिनरी यांच्या निविदा पुणे विभागतून रदद केल्यामुळे शासकीय निधीचा अपहार झाला नाही. तसेच CBO व शासनाची फसवणूक होण्यापासून बचाव झाला आहे.

ई) **<u>चुकीच्या कार्यवाहीमुळे माझे झालेले नुकसान :-</u>**

i) कोणताही गुन्हा किंवा भ्रष्टाचार न करता, प्रमाणिक कर्तव्य बजावून सुध्दा माझेवर सेवा समाप्ती आणि नांव काळया यादीत टाकण्याचा कलंक लागला आहे.

ii) यामुळे मला व माझे कुटुंबाचे सामाजिक, मानसिक, शाररिक स्वस्थ व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या सर्व बाबींसाठी वरिल प्रमाणे सर्व घटक जबाबदार आहेत.

iii) माझे नांव काळया यादीत टाकण्याबाबत चुकीच्या पध्दतीने केलेल्या शिफारशी मुळे दिनांक २०/०७/२०२३ रोजी, सेवा समाप्त केल्यापासून मी बेरोजगार आहे. माझेकडे आर्थीक उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध होत नाही. आज या घटनेस ७ महिन्यांचा कालावधी पूर्ण होत आहे.

iv) दैनंदिन कौटुंबीक खर्च, आई-वडीलांचे आजारपण, मुलिचे शिक्षण, गृहकर्जाची परतफेड इ. इत्यादी बाबींची पूर्तता होऊ शकत नाही. यासाठी माझे पत्नीचे स्त्रीधन विकून सध्या आम्ही प्रपंच चालवत आहोत.

v) माझे नांव काळया यादीत टाकण्याच्या कार्यवाही मुळे दरम्यानच्या काळात शासकीय भरतिसाठी मला पात्र होत आले नाही. याची सर्वस्वी जबाबदारी वरिल प्रमाणे नमुद संबंधीत घटकांची आहे.

vi) सदर चुकीच्या कार्यवाही विरूध्द न्याय मागणीसाठी मला मा.प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे अनावश्यकरित्या दावा क्रं. १२७८/२०२३ दाखला करावा लागला.

vii) तसेच मी तत्कालीन मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट, पुणे यांना सहकुटुंब आत्महत्या करण्याची अनुमती मिळणेबाबत विनंती अर्ज दाखल केला होता, पंरतू त्यास अदयाप अनुमती प्रदान करण्यांत आलेली नाही.

उ) **<u>चौकशी अहवाल मिळण्यासाठी संघर्ष :-</u>**

दिनांक २०/०७/२०२३ रोजी, माझ्या सेवा समाप्त करून माझे नांव काळयात यादीत टाक्याची कार्यवाही केले पासून मी वेळो-वेळी संबंधीत सेवा पुरवठादार संस्था T &M आणि प्रकल्प चौकशी समितीच्या अहवालाची, माझ्यावरील आरोपांची मागणी करत होतो परंतू मला कोणीही प्रतीसाद दिला नाही. शेवटी मला माहिती अधिकार अंतर्गत मंत्रालयात अर्ज करून सदरचा अहवाल उपलब्ध करून घ्यावा लागला. दिनांक २०/०७/२०२३ रोजी अंतिम केलेला अहवाल मला दिनांक २६/०९/२०२३ रोजी, माहिती अधिकार अंतर्गत सशुल्क घ्यावा लागला आहे.

ऊ) **<u>माझी मागणी :-</u>**

i) वरिल प्रमाणे दिनांक १४/०७/२०२३ रोजी, असंविधानीक पध्दतीने अंतिम करण्यांत आलेला चौकशी समितीचा अहवाल रदद करण्यांत यावा.

ii) मला माझे मुळ पदावर “संपादन अधिकारी, RIU, पुणे” येथे पुर्ननियुक्ती प्रदान करण्यांत यावी.

iii) दिनांक २०/०७/२०२३ रोजी माझे सेवा समाप्तीपासून पुर्ननियुक्ती होई पर्यंतच्या कालावधीचे पूर्ण वेतन अदा करण्यांत यावे.

किंवा

iv) मी दोषी आहे अशीच जर प्रकल्पाची धारणा असेल आणि वरिल प्रमाणे चौकशी समितीने केलेल्या कार्यवाही व कार्यपध्दतीशी आपण सहमत असला तर, मी नेमका कोणता गुन्हा केला आहे, कोणता भ्रष्ट्राचार केला आहे, किती रकमेचा भ्रष्टाचार केला आणि यामुळे प्रकल्पाचे काय नुकसान झाले आहे, प्रकल्पाचे हितास काय बाधा आली आहे की, ज्यामुळे कोणतीही न्यायीक आणि परिपूर्ण चौकशी न करता मला इतकी जबरी शिक्षा (सेवा समाप्ती व नांव काळया यादीत) सुनावण्यांत आली आहे, याचे माहिती मला देण्यांत यावी. तसेच दिनांक ०१/०३/२०२४ रोजी, आपणाकडे व T&M संस्थेकडे मागनी केल्या प्रमाणे, माहिती उपलब्ध करून देण्यांत यावी. जेणे करून मला सदरच्या अन्याया विरूध्द दिशादर्शक मार्गाने न्याय मिळवता येईल.

ऋ) **पुढील दिशा :-**

i) वरिल प्रमाणे माझे अर्जाचा सहानभुती व निपक्षपाती पध्दतीने विचार करून माझी वरिल प्रमाणे केलेली मागणी पुढील १५ दिवसांत मान्य करण्यांत यावी, नम्र विनंती.

ii) वरिल प्रमाणे माझी विनंती मान्य न झाल्यास,

१) प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी यांनी अधिकारांचा गैरवापर करून केलेल्या असंविधानिक व अन्यायकारक कार्यवाहीचे विरूध्द मला नाईलाजास्तव “**अमरण उपोषण**” व इतर न्याय मार्गाचा अवलंब करावा लागेल, ही नम्र विनंती.

सोबत :- न्यायालयीन निर्णयांच्या प्रती

कळावे, धन्यवाद !

(सुनिल विजय शेलार)
Designation: Ex. Procurement Officer
प्लॉट क्रं. ५८ अ, पीएमटी कॉलनी,
श्री जय तुळजा भवानी माता सह.गृह संस्था, बिबबवेवाडी, पुणे - ३७

**प्रत, माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. प्रमुख, पीआययु(कृषि), स्मार्ट प्रकल्प, पुणे
२) मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे